क्रमांक : ३४९१
दिनांक : १७/१२/२००९.

# शेतकरी बंधूना जाहीर आवाहन

हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी बंधूना कळविण्यात येते की, तूर व हरभरा किड-रोग सर्वेक्षण प्रकल्पाअंतर्गत केलेल्या सर्वेक्षणात तूर व हरभरा पिकावर किडींचा प्रादूर्भाव आढळून आला आहे. तरी खालीलप्रमाणे पिक निहाय तात्काळ उपाययोजना कराव्यात.

**१. तूर -**

हिंगोली जिल्ह्यात तूर पिक सध्या फुलोरा ते शेंगा पक्व होण्याचे अवस्थेत आहे. सध्या तूरीवर शेंगा पोखरणारी अळी आढळून आली आहे. १० % पेक्षा जास्त शेंगा पोखरल्या असल्यास एन्डोसल्फान ३५ % ईसी २० मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २० मि.ली. अधिक डायमिथोएट ३० ईसी १० मि.ली. किंवा मिथाईल डिमेटॉन २५ ईसी १० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून साध्या पंपाने फवारावे. पॉवर स्प्रेसाठी किटकनाशकाची मात्रा तिनपट करावी.

तुरीवरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी एचएनपीव्ही ५०० मि.ली. (२५० एलई) अधिक एक चमचा धुण्याची निळ किवा चिकटणारा पदार्थ किंवा निंबोळी अर्क ५ % अधिक १० मि.ली. एन्डोसल्फान ३५ % ईसी १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पॉवर स्प्रेसाठी किटकनाशकाची मात्रा तिनपट करावी.

**२. हरभरा-**

हरभऱ्यावर घाटेअळीचा प्रादूर्भाव आढळूल आल्यास निंबोळी अर्क ५ % किंवा एचएनपीव्ही २५० एलई किंवा एन्डोसल्फान ३५ ईसी २० मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून साध्या पंपाने फवारावे. पॉवर स्प्रेसाठी किटकनाशकाची मात्रा तिनपट करावी. असे आवाहन उप विभागीय कृषि अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

**प्रति ,**

१) नॅशनल ईन्फॉर्मेशन सेंटर (एनआयसी)
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
२) जिल्हा माहिती अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
३) जिल्हा प्रतिनिधी ,
दैनिक ----------------------------------

प्रसिद्धीार्थ कृपया तात्काळ प्रसिध्दी देण्यात यावी हि विनंती.

**उपविभागीय कृषि अधिकारी**
**हिंगोली**

Dec-09